# 85th Annual Report
## 2018-2019

Institute of

**The Poona School & Home for the Blind Trust**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

*

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND BOYS**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

*

**THE SHIRDI SAI-BABA NURSERY**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

*

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND GIRLS**
Near Gandhi Bhavan, Kothrud, Pune: 411 038 Tel. (020) 25384589

*

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND**
Girls (Vocational ) Training Center
Near Gandhi Bhavan, Kothrud, Pune: 411 038 Tel. (020) 25384589

*

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND**
Teachers Training Center(D.SE.(VI) Two years course
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26053195

# The Poona School & Home for the Blind Trust


Establishment : 28th Feb. 1934

Founder : LATE DR. S. R. MACHAVE

Ph.: 020 - 26122686, Mobile No. - 9011017871

Registration No. -F18695

www.puneblindschool.org / admin@puneblindschool.org


## MEMBERS OF MANAGING COMMITTEE

- **Mr. Abhijit Pawar** --- Chairman
- **Mr. Mahendra Pisal** --- Secretary
- **Mrs. Mrunalini Pawar** --- Treasurer
- **Mr. Jaydeep Mane** --- Co.Treasurer
- **Mrs. Bharati Pawar** --- Managing Committee Member
- **Mr. Vasudev Medankar** --- Managing Committee Member
- **Mr. Abhay Mane** --- Managing Committee Member
- **Miss. Janhavi Pawar** --- Managing Committee Member

## Staff : Name & Designation

| SR. NO. | NAME | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Krishna Shewale | Administrative Officer |
| 2 | Mrs. Yogini Jati | Administrative Officer |
| 3 | Mr. Ravindra Bamne | Accountant |
| 4 | Mr. Vinayak Vishnu Dhawale | Accountant |
| 5 | Mrs. Ritika Potdar | Asst. Accountant |
| 6 | Mrs. Rekha Raut | Special Teacher |
| 7 | Mr. Amrut Lokhande | Special Teacher |
| 8 | Mrs. Asha Kanse | Special Teacher |
| 9 | Mr. Tejas Bendre | Computer Teacher |
| 10 | Miss. Humasamarin Shaha | Special Teacher |
| 11 | Mr. Santosh Jagtap | Music Teacher |
| 12 | Mrs. Prabha Nimbre | Care Taker |
| 13 | Mrs. Anita Chalwadi | Care Taker |

| | | |
|---|---|---|
| 14 | Miss. Kalabai Chavan | Care Taker |
| 15 | Mrs. Sheetal Gaikwad | Care Taker |
| 16 | Smt. Shalini Dawande | Care Taker |
| 17 | Mr. Popat Kalbhor | Gardner |
| 18 | Mrs. Vidya Gajare | Instructor |
| 19 | Mrs. Savita V. Shinde | Instructor |
| 20 | Mr. Sidram S. Jakkapalli | Instructor |
| 21 | Mrs. Snehal G. Madiwale | Instructor |
| 22 | Ms. Bhavana P. Sabade | Music Teacher |
| 23 | Ms. Radhika S. Rasane | Special Teacher |
| 24 | Ms. Mayuri R. More | Special Teacher |
| 25 | Mrs. Leena S. Beloshe | Special Teacher |
| 26 | Mr. Prashant R. Shinde | Special Teacher |
| 27 | Miss. Kranti N. Lambe | Special Teacher |
| 28 | Miss. Gayatri B. Savale | Special Teacher |
| 29 | Miss. Shilpa A. Fulbandhe | Special Teacher |
| 30 | Mrs. Swati R. Pawar | Special Teacher |
| 31 | Mrs. Sayali Kulkarni | Computer Teacher |
| 32 | Mr. Vikas B. Rairikar | Instrument Instructor |
| 33 | Mrs. Archana R. Kamble | Care Taker |
| 34 | Mrs. Sujata V. Raut | Care Taker |
| 35 | Mr. Pramod G. Chorat | Care Taker |
| 36 | Mrs. Archana K. Sawant | Care Taker |
| 37 | Mrs. Madhuri A. Khanore | Care Taker |
| 38 | Smt. Surekha L. Landge | Sweeper |
| 39 | Sunil B Ghode | Driver |
| 40 | Smt. Maya Jadhav | Care Taker |
| 41 | Mrs. Vaishali Magar | Care Taker |
| 42 | Mrs. Kalpana Nanaware | Care Taker |
| 43 | Mrs. Rampyari P. Khedkar | Warden |
| 44 | Mrs. Nanda H. Kale | Warden |
| 45 | Dr. Gayatri Mane | Dietitian |
| 46 | Vaishali Bhimpure | Physio Therapist |

THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND BOYS
14/17, KOREGAON PARK, PUNE: 411 001

## TEACHING STAFF

| Sr.No | NAME OF EMPLOYEE | DESIGATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Chandrakant Waman Bhosale | Principal |
| 2 | Smt. Pratibha Ramchandra Korpe | Spl. Teacher |
| 3 | Mr. Damodar Narsappa Sargam | Spl. Teacher |
| 4 | Mr. Zumber Narayan Irnak | Spl. Teacher |
| 5 | Mr. Ganesh Shamrao Patil | Spl. Teacher |
| 6 | Mrs. Manisha Sanjay Shewale | Spl. Teacher |
| 7 | Mrs. Sangita Sadanand Mate | Music Teacher |
| 8 | Mr. Rajendra Pandurang Sutar | Phy. Edn. Instructor |
| 9 | Mr. Ranganath Dagadu Gajare | Craft Teacher |
| 10 | Mr. Rameshwar Balbhim Khile | Craft Teacher |
| 11 | Mr. Sandeep Dnyandeo Jagadale | Social Worker |

## NON - TEACHING STAFF

| Sr.No | NAME OF EMPLOYEE | DESIGATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Ruidas Rajaram Kuchekar | Jr. Clerk |
| 2 | Mr. Dattatray Dashrath Tikone | Asst. Cook |
| 3 | Mrs. Laxmi Narsappa Swami | Asst. Cook |
| 4 | Mrs. Kusum Suresh Patkar | Maid Servant |
| 5 | Miss. Yogita Datta Pawar | Care taker |
| 6 | Mr. Subhash S. Sherikar | Driver |
| 7 | Mr. Bhagwan Einath Giri | Cook |
| 8 | Mr.Suresh Rajaram Jalalwad | Watchman |
| 9 | Mr. Shikamani Gandham | Sweeper |
| 10 | Mr. Ashok Bhima Kedari | Care taker |
| 11 | Mr. Laxman Mahadu Korwan | Care taker |
| 12 | Mr. Nitten Satyawan Kharat | Care taker |
| 13 | Dr. Sanjay Naik | V.M.O. |

**THE POONA SCHOOL AND HOME FOR THE BLIND GIRLS,**
**KOTHRUD, PUNE**

## TEACHING STAFF

| Sr. No | Name of Employee | Designation |
|---|---|---|
| 1 | Mr. Rajaram Maruti Jagtap | Principal |
| 2 | Mrs. Varsha Mahendra Ranka | Special Teacher |
| 3 | Mrs. Jaishree Anand Thatte | Special Teacher |
| 4 | Mrs. Ujjwala Narayan Soni | Special Teacher |
| 5 | Mrs. Janhavi Dinesh Madne | Physical Education Instructor |
| 6 | Mrs. Savita S. Waghmare | Social Worker |

## OFFICE STAFF

| | | |
|---|---|---|
| 1 | Miss. Varsha Dattatray Gulavani | Senior Clerk |
| 2 | Mr. Naresh Pyarelal Pardeshi | Junior Clerk |
| 3 | Mr. Deepak Manik Raut | Office Peon |

## HOSTEL STAFF

| | | |
|---|---|---|
| 1 | Mrs. Tejabai Hulram More | Cook |
| 2 | Mr. Liladhar Ramkrushan Gurav | Care Taker |

[विशेष–ध.अ./मुं.सा.वि./२म.

051

सत्यमेव जयते

## नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव दि पुना स्कुल अॅन्ड होम फॉर दि ब्लाईंड
१४-१६ कोरेगांवपार्क पुना

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ १८६४५ (पुणे)
मिसेस एम. डी. देसाई यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ८/५/०३ १९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही [illegible]

पदनाम
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

# Certificate of Registration of Societies.

## ACT XXI OF 1860.

**No.** 1807 **of 19** 49**-19** 50.

**I hereby certify** *that* The Poona School and Home for the Blind.

... ... ...

*has this day been registered under the Societies Registration Act, XXI of 1860.*

*Given under my hand at* Bombay

*this* Twenty-fifth *day of* July

*One thousand nine hundred and* Forty-nine.

*Registrar of ~~Joint Stock~~ Companies.*
Bombay.

J. S C. 36.
M. P. W.—2/74/48—P. J. (M. F. P.) O. P. 991—6-7-48—2000.

**OFFICE OF THE COMMISSIONER OF INCOME TAX-IV**
**60/61, PRAPTIKAR SADAN, ANNEX BUILDING,**
**ERANDWANA,PUNE-4110004**
**TeleFax.: 020 25412215**

No.PN/CIT-IV/T&J/80G/2/2012-13 /88\ Date:-21/06/2012

To,
The Secretary,
**The Poona School & Home For The Blind Trust,**
14-17, Koregaon Park,
Dr. S.R. Machave Road,
Pune- 411 001.

Sir,

Sub : Your application for renewal of approval
U/s. 80G of the Income Tax Act,1961-reg-

Please refer to your application dated 13/04/2012 on the above subject.

2 From the annexures to the application, it is noticed that your Trust was approved U/s. 80G of the Income tax Act,1961 for the period 01.04.2007 to 31.03.2010 vide order dated 02.11.2007.

3 As per CBDT, New Delhi's Circular No.07 of 2010, existing approvals expiring on or after 01.10.2009 shall be deemed to have been extended in perpetuity unless it is withdrawn. In your case, the approval U/s. 80G of the Income tax Act,1961 is valid for the period after 1st October, 2009. In view of this position, I am directed to inform that the approval U/s. 80G granted in your case shall be deemed to have been extended in perpetuity unless specifically withdrawn.

Yours faithfully,

PR Chadha

**(P.R. Chadha)**
Income tax Officer (T&J)
For Commissioner of Income tax-IV,Pune

आयकर अधिकारी (तकनीकी)-IV, पुणे

No. E/17-19/62
Office of the Charity Commissioner,
Bank of India
Bldg. , 3rd Floor,
Flora Fountain, Fort, Bombay 1.

# Certificate

This is to certify that, ***The Poona School & Home For the Blind*** is registered under the Public Trust Act 1950 under N0. F-161 (Bom.) with the Public Trust Registration Officer, Gr. Bombay Region Bombay. It is further certified that, 'The Poona School And Home For the Blind is non- Cornmun Charitable institution.

Given under the seal of the Charity Commissioner, Maharashtra State, Bombay.
This twenty seventh day of August, nineteen hundred and sixty two.

(Sd/-)
for Charity Commissioner,

Maharashtra State, Bombay

27/ 8/ 1 962

**No. 0300004742016**

**Government of India**
**Ministry of Home Affairs**
**Foreigners Division**
**(FCRA Wing)**

NDCC-II Building, Jai Singh Road,
New Delhi-110001

**Dated: 06-08-2016**

To,
**The Chief Functionary,**
**The Poona School and Home for the Blind Trust**
**14-17,KOREGAON PARK,DR.S R MACHAVE ROAD,PUNE-411001, MAHARASHTRA, PUNE, Maharashtra, Pune, 411001**

**Subject: Renewal of Registration under Foreign Contribution (Regulation) Act,**

Sir/Madam

With reference to your application dated **21-01-2016** seeking renewal of registration under the Foreign Contribution (Regulation) Act, 2010, I am directed to convey the approval of competent authority for renewal of registration of your Association in terms of the provisions contained in Section 16 of Foreign Contribution (Regulation) Act, 2010 read with Rule 12 of Foreign Contribution (Regulation) Rules, 2011 as amended from time to time, as follows:-

| | |
|---|---|
| Registration Number | **083930478** |
| Nature : | **Educational,Social** |

2. The association shall receive foreign contribution only in its designated/exclusive bank account **000501049001** in **I.C.I.C.I. Bank**, **A WING,SHANGRILLA,BUND GARDEN ROAD, PUNE-411001, PUNE, Maharashtra, Pune, 411001** as mentioned in its application for online application for grant of renewal of registration.

3. In terms of section 18 of the Foreign Contribution (Regulation) Act, 2010 read with Rules 17 of the Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, you are advised to furnish intimations online within the prescribed time to the Central Government of the amounts of each foreign contribution received by you, the source and the manner in which the foreign contribution was utilised, as per the provisions of the Act and the Rules. An association is required to furnish the return even when the particulars are 'NIL'. The FC-4 form is required to be submitted online on this Ministry's website https://fcraonline.nic. The Bank Account mentioned in your application should be used for receiving foreign contribution and no other amount should be credited to this account. The Association should immediately intimate online, within 15 days, in Form FC-6 to this Ministry regarding any change in the name of the Association, aims and objects, its address and Bank/Bank Account.

4. The association cannot bring out any publication (registered under PRB Act, 1867) or act as correspondent, columnist, editor, printer or publisher of a registered newspaper or engage in the production or broadcast of audio news or audio visual news or current affairs programmes through electronic mode or any other electronic form or any other mode of mass communication at a later stage thereby attracting provisions of the Section 3(1) (g) and (h) of the FC(R) Act, 2010. In addition to this, the association is forbidden from getting involved in any activity of political nature.

5. You are requested to note the provisions of Section 7 of FC(R) Act, 2010 and Rule 24 of FC(R) Rules, 2011 and ensure that before any funds are passed on to any person/association in India that the recipient is (i) eligible to accept foreign contribution under the Act, i.e., recipient association is registered under the Act, or has obtained Prior Permission of the Government under Section 11 of the Act, and (ii) the person/association is not prohibited under the Act.

6. Physical inspection of the activities done by the Association may be carried out at any time by this Ministry.

7. You are requested to familiarize yourself with the provisions of Foreign Contribution (Regulation) Act, 2010 and Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, available at this Ministry's website https://fcraonline.nic.in/ to ensure strict compliance of the Act/ Rules. Failure to comply with any of the provisions of said Act/ Rules will make you liable for action under the relevant provisions of the Foreign Contribution (Regulation) Act, 2010.

8. This renewed certificate is valid for a period of five years with effect from **01-11-2016**.

9. The email containing the renewed registration certificate may be sent immediately to the Bank mentioned above.

10. The renewal of registration is subject to compliance of the provisions of Foreign Contribution (Regulation) Act, 2010/ Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, by the association and also to the final outcome of enquiry/ case, if any, pending against the association.

11. This is a digitally signed certificate to be validated digitally using the signature panel using Adobe Acrobat Reader (Ver 5.0 or above). The digital intimation is authenticated by a digital signature obtained from a certifying authority under the Information Technology Act 2000.

12. Banks are requested to verify online the validity of the certificate using fcraonline.nic.in.

Yours faithfully

Digitally signed by DEVARAJ RAJALAKSHMI
Date: 2016.08.06 14:23:10 IST
Reason: Online FCRA Services
Location: Ministry of Home Affairs, New Delhi

**Rajalakshmi Devaraj**
**Director**
**Tel. 01123438245**

# पुणे मुलांची अंधशाळा वार्षिक अहवाल- २०१८-१९

**दि. ०४/०४/२०१८ (बुधवार)** रोजी बालकल्याण संस्थेत रोडचे उद्‌घाटन असल्याने ५३ मुले, सौ. भारती चोभारकर सौ. राऊत, श्री. सुतार, श्री. गजरे, श्री. लोखंडे असे गेले होते.

**दि. ०६/०४/२०१८ (शुक्रवार)** रोजी बालकल्याण येथे वार्षिक बक्षिस समारंभ कार्यक्रम झाला. त्यावेळी श्री. सुतारसर व श्री. खिळेसर व १० मुले गेली होती. अथर्व काळे इ.६वी अ, या विद्यार्थ्याला व्यायाम उपक्रम सहभागाबद्‌दल बक्षिस देण्यात आले व शाळेला स्विमिंग उपक्रमात सहभागाबद्‌दल बक्षिस मिळाले.

**दि.१३/०४/२०१८ (शुक्रवार)** स.११.०० वा. पालक सभा झाली. पालकांच्या समस्या, सूचना जाणून घेतल्या त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उन्हाळयाच्या सुट्‌टीसाठी विद्यार्थी घरी गेले. यावेळी प्रशासकीय अधिकारी श्री. शेवाळेसर, जगदाळे सर, सर्व शिक्षक उपस्थित होते.

**दि. १४/०४/२०१८ (शनिवार)** रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

पुणे विद्यार्थीगृह - इंजिनिअरींग कॉलेज सभागृह (सहकार नगर), पुणे-०१ येथे स.११.०० वा. कार्यक्रम होता. तेथे सर्व शिक्षक गेले होते.

**दि. १५/०४/२०१८ (रविवार)** रोजी - मेक माय ड्रीम फाउंडेशन कोथरुड, पुणे-३८. येथे स्वप्न स्वरांचे-संगीत स्पर्धा आयोजिण्यात आल्या होत्या. त्यात अंतिम फेरीतील यशस्वी विद्यार्थी- १) शुभम पाटोळे - कोंगो वादन - द्वितीय क्र.२०००/- रु., २) संग्राम आरडे - ढोलकी - सोलो - तृतीय क्र.१०००/- रु. ३) संकेत सावळे की बोर्ड वादन - तृतीय क्र.१०००/- रु., ४) नोमान तांबोळी - की बोर्ड वादन - उत्तेजनार्थ - ५००/- रु., ५) यश वाघ - गायन - उत्तेजनार्थ- ५००/- रु., बक्षिसे मिळाली. यांना मार्गदर्शन श्री. खिळेसर व श्री. संतोष जगताप यांनी केले. बरोबर श्री. केदारी व श्री. शेरीकर पण गेले होते.

**दि.१६/०४/२०१८ (सोमवार)** रोजी डॉ. चेतन बुरुजवाले यांचे हृदयविकार व बी.पी.-समज आणि गैरसमज यांवर लेक्चर झाले. त्यांनी हृदयविकार बी.पी., डायबेटिस, लठ्‌ठपणा इ.वर माहिती सांगितली. त्यावेळी शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री. शेवाळेसर, प्राचार्य श्री. भोसलेसर, जगदाळेसर व इतर स्टाफ ही उपस्थित होता.

डॉ. चेतन बुरुजवाले यांच्या समवेत श्री. विजय कांबळे त्यांचे सहकारी पण उपस्थित होते.

**दि. २३/०४/२०१८ (सोमवार)** स.११.०० ते १.३० पर्यंत डॉ. होमियार व श्री. हनुमंतसर यांचे ब्रेल व टेक्निकचा उपयोग यावर लेक्चर झाले. यावेळी प्राचार्य श्री. भोसलेसर कोरेगांव पार्क व कोथरुड येथील सर्व शिक्षक, सोशलवर्कर उपस्थित होते. सुरुवात श्री. भोसलेसर यांनी केली तर आभार श्री. पाटीलसर यांनी मानले.

**दि. २४/०४/२०१८ (मंगळवार)** रोजी लैगिंक शिक्षणावर लेक्चर झाले. त्यावेळी अमोल काळे, सुषमा

खराडे, मेघा काळे आले होते.

त्यांनी एक विषय घेवून नाटिका सादर करण्यास सांगितली. सर्वांनी त्यात सहभाग घेतला.

यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. शेवाळेसर प्राचार्य श्री. भोसलेसर, जगदाळेसर, दोन्ही शाळेतील शिक्षकवर्ग उपस्थित होता. सुरुवात श्री. भोसलेसर यांनी केली तर आभार सौ. रांका यांनी मानले.

**दि. २५/०४/२०१८ (बुधवार) ते २७/०४/२०१८ (शुक्रवार)** Spoken English श्री. अमन मोदीसर व अनिता अय्यर मॅडम घेत होते. त्यावेळी दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

**दि. ०१/०५/२०१८ (मंगळवार)** रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त स. ९.०० वा. झेंडावंदनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

त्यावेळी सर्व शिक्षक उपस्थित होते. प्राचार्य श्री. भोसलेसर यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

नंतर राष्ट्रगीत घेण्यात आले व माहिती श्री. भोसलेसर यांनी सांगितली सर्व स्टाफ ही उपस्थित होता.

**दिनांक २३/०६/२०१८** रोजी सायकल भेट वाटप कार्यक्रम झाला. यावेळी क्रिडा समिक्षक श्री. सुनंदन लेले शाळेत आले होते व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सायकल चालविण्याचा अनुभव दिला. मुलांनी गाईडसह सायकल चालवण्याचा आनंद घेतला. प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. शाळेतील अंध शिक्षकांनी सायकल चालवली. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले उपस्थित होते. विद्यार्थी खूप आनंदी होते. शाळेसाठी सायकल देण्यात आल्या.

**दि. २६/०६/२०१८ – मंगळवार** रोजी शाहु महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात शाहु महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सौ. चोभारकर, सौ. माने, सौ. राऊत श्रीमती. कोरपे व श्री. सरगमसर श्री. जगतापसर यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. मनिषा शेवाळे मॅडम यांनी केले.

**दि. २७/०६/२०१८–** रोजी डॉ. हेलन केलर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना डॉ. हेलन केलर यांच्या जीवनकार्याची माहिती करुन देण्यात आली. विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सौ. शेवाळे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले.

**दि. २७/०७/२०१८ –** शाळेत संगीत समिती तर्फे गुरुपौर्णिमा कार्यक्रम झाला. बालसभा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्यांच्या गोष्टी सांगितल्या. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

बॅक ऑफ बडोदा पुणे झोन यांच्या वतीने शाळेला वस्तूभेट म्हणून वॉटर कूलर व वॉटर प्युरीफायर भेट देण्यात आला. बॅकचे एचआर श्री. उमेश अडसूळ व श्री. संतोष वाफे, श्री. कृष्णा शेवाळे प्र.अधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. शेवाळे साहेबांनी आभार व्यक्त केले.

**दि. ०१/०८/२०१८ –** शाळेत दरवर्षीप्रमाणे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. फोटोपूजन व पुष्पहार अर्पण केला. विद्यार्थ्याची भाषणे झाली. सौ. माटेबाई, रेखा राऊत श्रीमती कोरपे मॅडम यांनी माहिती वाचून दाखविली.

श्री. गजरेसर, श्री. सरगमसर, श्री. जगतापसर यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शेवाळे मॅडम यांनी केले तर श्री. पाटीलसर यांनी आभार मानले.

**दि. ०२/०८/२०१८ –** बालकल्याण संस्थेत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील ६ विद्यार्थ्यांना भाग घेतला होता. श्री. गजरे सर, श्री. लोखंडे सर, हुमा शहा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दि. ०७/०८/२०१८ –** बालकल्याण संस्थेतर्फे चित्रफ्रेम बनविणे स्पर्धा झाली होती. शाळेने भाग घेतला होता. डॉ. हेलन केलर यांची फ्रेम बनविली होती. शाळेला दुसरा क्रमांक मिळाला.

विद्यार्थ्यांनी चित्रफ्रेम बनविली श्री. लोखंडे सर व हुमा शहा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दि. ०९/०८/२०१८ –** नैसर्गिक वायु व गॅस मंत्रालय भारत सरकार मुंबई यांच्या वतीने आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणासाठी इंधन बचत या विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले व सुंदर अशी चित्रे काढली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भाग घेतला. निबंधासाठी श्रीमती. कोरपे, सौ. शेवाळे, सौ. राऊत श्री. पाटील, श्री. लोखंडे यांनी मागदर्शन केले. चित्रकलेसाठी श्री. जगताप व श्री. गजरेसर यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांनी या स्पर्धेकरिता तयारी करुन घेतली. प्र.अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसर व प्राचार्य श्री. भोसलेसर यांनी स्पर्धे बाबत मार्गदर्शन केले.

**दि. १०/०८/२०१८ –** राष्ट्रीय जंतनाशक दिन शाळेत साजरा करण्यात आला. भारत सरकार मोहिमे अंतर्गत म.न.पा.पुणे यांच्या वतीने शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वास्थ्याकरीता जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. याबाबत पालकांना मार्गदर्शन व प्रचार प्रसार करण्यात आला. इ.१ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या दिल्या. काही पालकही या कार्यक्रमास उपस्थित होते. सौ. माटेबाई, हुमा शहा, योगीता पवार श्री. कोरवण श्री. लोखंडे, यांनी कार्यक्रम पार पाडला. श्री. राजाराम जगताप यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमास प्राचार्य चंद्रकांत भोसले व प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे उपस्थित होते.

**दि. १५/०८/२०१८ –** १५ ऑगस्ट-७२ वा स्वातंत्र्यदिन शाळेत मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात स्वातंत्र्यदिना निमित्त सर्वांना शुभेच्छा देवून मार्गदर्शन पर भाषण सादर केले, विद्यार्थ्यांनी देशावरील स्व:रचित कविता सादर केल्या विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

प्रमुख पाहुण्यांसमोर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, कवायत प्रकार व झांजपथकाचे सादरीकरण केले प्रा. चंद्रकांत भोसले यांचे भाषण झाले या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. पालकांचा सहभाग ही होता.

शेवटी घोषणा व वंदेमातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांना पेढे व खाऊ वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. मनिषा शेवाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती. प्रतिभा कोरपे यांनी केले.

**दि.१८/०८/२०१८ –** रोजी शाळेच्या संगीत समिती तर्फे गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेचा माजी विद्यार्थी नवनाथ शिंदे व त्याचे सहकारी यांनी कार्यक्रम सादर केला या कार्यक्रमात भावगीते, देशभक्तीपर गीते व इतर गाणी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राजाराम जगताप यांनी केले तर सौ. शेवाळे मॅडम यांनी आभार मानले सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग व प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले होते.

**दि. २४/०८/२०१८ –** सुंदराबाई मराठे विद्यालय खराडी पुणे या शाळेतील ६० विद्यार्थीनीनी मुलांना राख्या बांधल्या मुलांची ओवाळणी करुन त्यांना खाऊ देण्यात आला. विद्यालयातील श्री. वळसेसर, सौ. साळुंके, सौ. सपकाळ हे शिक्षक आले होते.

श्री. वळसेसर व सौ. साळुंके मॅडम यांचे भाषण झाले. बहीण भावांच्या नात्यांची महती त्यांनी सांगितली श्री. कृष्णा शेवाळे सर (प्र.अधिकारी) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

प्राचार्य चंद्रकांत भोसले सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यालयाचे आभार मानले सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

**दि. २७/०८/२०१८ –** रोजी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयातील N.S.S. च्या विद्यार्थ्यांनी शाळेत राखी पौर्णिमा साजरी केली. विद्यार्थीनीनी मुलांना राख्या बांधल्या व खाऊ वाटप केले.

या कार्यक्रमात शाळेचा ऑक्रेस्ट्रा सादर केला. बहारदार गाणी विद्यार्थ्यांनी सादर केले. एचओडी श्री. अविनाश पाटील सरांनी मार्गदर्शनपर भाषण केले. प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसर व प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले व सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

**दि. ३०/०८/२०१८ –** म.न.पा.पुणे नगरसेविका सौ. गायत्री खडके व महिला आघाडी कसबा पेठ, पुणे यांनी विद्यार्थ्यांना राखी बांधून पौर्णिमा साजरी केली. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आली. सौ. गायत्री खडके यांनी आपली परंपरा व सणाचे महत्व सांगितले.

**दि. ३१/०८/२०१८ –** BMI Trust मुंबई यांनी ब्रेलपुस्तके वाटप कार्यक्रम झाला. आयसीबीसी बँकेचे डायरेक्टर श्री. सॉंगलिन, रेहा गेरा, विद्या भोसले आले होते. जनरल नॉलेज व लाईफ स्टाइल संदर्भात पुस्तके दिली. प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसर यांनी नियोजन केले होते.

**दि. ०४/०९/२०१८ –** Bright side dentisty या संस्थे मार्फत सर्व विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. सौ. सोनिया धर्माधिकारी यांनी टूथपेस्टचा वापर व दात घासण्याची पद्धती व स्वच्छता यावर मार्गदर्शन केले.

**दि. ०४/०९/२०१८ –** बालकल्याण संस्थेत दहिहंडीचे नियोजन केले होते. आपल्या शाळेतील मुलांनी दहिहंडी फोडली. मुलांनी नृत्य करीत आनंद घेतला. शाळेचे विद्यार्थी व श्री. गणेश पाटीलसर श्री. लोखंडेसर श्री. सुतारसर, हुमा समरीन शहा यांनी कार्यक्रमात भाग घेतला.

**दि. ०६/०९/२०१८ –** डॉ.एच.व्ही. देसाई हॉस्पीटल व अगरवाल ट्रस्ट/क्लब पुणे यांच्यातर्फे इ.१ ली १० वी च्या विद्यार्थ्यांची डोळे तपासणी करण्यात आली.

**दि. १२/०९/२०१८ –** शाळेत विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. या दिवशी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची व कार्यालयीन अधिकारी यांची भुमिका विद्यार्थ्यांनी पार पाडली. दिवसभर विद्यार्थ्यांनी शाळेचे कामकाज पाहिले. बालसभेत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य भोसलेसरांनी मार्गदर्शनपर भाषण केले. उत्कृष्ट विद्यार्थी निवड करण्यासाठी श्री. जगताप श्री. सरगम यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

**दि. २१/०९/२०१८ –** शाळेतील गणपतीची विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पाडली. विद्यार्थ्यांनी व विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. ढोलपथकाचे सादरीकरण झाले. दोन्ही शाळेतील शिक्षक उपस्थित होते. शालेय परिसरात मिरवणूक व पर्यावरण पूरक अशा

प्रकारे गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

**दि. २२/०९/२०१८** मंथन वाचन प्रकल्प अंतर्गत शाळेतील चार विद्यार्थ्यांनी ब्रेलवाचन करत चिंचवड येथील जय भवानी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचन करुन दाखविले श्री. रंगनाथ गजरे यांनी मार्गदर्शन केले.

**दि. २२/०९/२०१८ –** शाळेत रोटरी क्लब ॲमेनोरा यांच्यावतीने कविता वाचन व कविता गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्व:रचित कविता सादर केल्या व गाणी गायली या कार्यक्रमास डॉ. प्रतिभा कटारिया फस्ट लेडी, कमलेश आनंद उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांना खेळणी व खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. खिळे सर, श्री. गजरे सर व श्रीमती. कणसे मॅडम यांनी नियोजन केले. मेरी कविता, मेरे गीत हा कार्यक्रम ११.३० ते १.०० या वेळेत पार पाडला, १४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. श्री. कृष्णा शेवाळे प्र.अ. यांनी नियोजन केले.

**दि. ०२/१०/२०१८–** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती एकत्रितपणे साजरी करण्यात आली. फोटो पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. विद्यार्थ्यांची भाषणे झाली. प्राचार्य श्री. भोसले यांनी मुलांना मार्गदर्शन करुन माहिती दिली. श्री. सरगम सर श्री.जगतापसर यांनी भाषण केले. रघुपती राघव राजाराम हे भजन विद्यार्थ्यांना ऐकविण्यात आले श्री. गणेश पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

**दि. ०३/१०/२०१८ –** दिव्यांगासाठी सुलभ मतदान प्रक्रिया, मतदान जागृती कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. मा. तहसीलदार, श्री. अनिल कोरडे, सब तहसीलदार प्रशांत कसबे झोनल ऑफीसर विद्या गायकवाड, प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसर व प्राचार्य चंद्रकांत भोसले सर उपस्थित होते. मतदान कसे करतात. दिव्यांगासाठी सोयी सवलती मतदार नोंदणी व इतर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मतदानावर कविता सादर केली. मुलांनी शंका व प्रश्न विचारले. अधिकाऱ्यांनी संवाद साधला. सर्व शिक्षकवर्ग व सोशल वर्कर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. राजाराम जगताप यांनी केले तर श्री. रंगनाथ गजरे यांनी आभार मानले.

**दि. ०३/१०/२०१८ –** आधुनिक पांढरीकाठी/स्मार्टकेन वितरणाचा कार्यक्रम झाला विठ्ठल मेश्राम व विशाल मेश्राम यांनी डेमो दाखविला स्मार्टकेन बाबत माहिती दिली सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. लायन्स क्लबचे प्रांतपाल व पदाधिकारी प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे प्राचार्य चंद्रकांत भोसले हे उपस्थित होते. शाळेसाठी स्मार्टकेन देण्यात आली.

**दि. ०६/१०/२०१८ –** राज्यस्तरीय दृष्टीहीनाच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सोलापूर येथे केले होते. शाळेच्या क्रिकेट संघाने भाग घेतला होता. स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी व रोख बक्षिस मिळाले. श्री. सुतारसर व श्री. गजरेसर, श्री. अशोक केदारी गेले होते. प्रशासकीय अधिकारी श्री. शेवाळेसर व प्राचार्य चंद्रकांत भोसले यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

**दि. ११/१०/२०१८ –** गुरुवार रोजी आफ्रिकेतील इथियोपियाच्या पंतप्रधानाच्या पत्नी झिनाश टायाचू व त्यांचे शिष्टमंडळांनी शाळेस भेट दिली. शिष्टमंडळात गुडीना तुमसा फाउंडेशन संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक लेन्सा गुडीना, कार्यक्रम संचालक इयोब्द इयोनस व शिक्षण समन्वयक शिक्षाई मिल्की इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. त्याबरोबर सकाळ माध्यम समुहाचे अध्यक्ष श्री. प्रतापराव

पवार, पुणे अंधशाळा ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अभिजीत पवार, विश्वस्त सौ. मृणाल पवार, संस्था सचिव श्री. महेंद्र पिसाळ, प्रशासकिय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे प्राचार्य श्री.चंद्रकांत भोसले उपस्थित होते. दृष्टीहीन विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रशिक्षण व पुनर्वसन याविषयी अभ्यासपूर्ण पहाणी करण्यासाठी टायाचू यांनी शाळेला भेट दिली. संस्थेचे आवार, परिसर, संगणक वर्ग, मल्लखांब प्रात्यक्षिक, लो व्हिजन वर्ग, चित्रकला, संगीत व वाद्यवृदांचे सादरीकरण गायन नृत्य पाहून सर्व परदेशी पाहुणे भारावून गेले होते. अंधशाळेच्या कामकाजाची माहिती संस्थेचे अध्यक्ष श्री. अभिजीत पवार यांनी दिली. ढोल लेझीमच्या पथकाने परदेशी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पुणे मुलांची अंधशाळा आणि कोथरुड पुणे मुलींच्या अंधशाळेतील विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

कोथरुड मुलींची अंधशाळेच्या प्रशासकीय अधिकारी सौ. प्रिती पेठकर व मुख्याध्यापिका सौ. वर्षा रांका उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे साहेब यांनी केले होते. शैक्षणिक विभागाची सर्व तयारी करण्यासाठी सर्व शिक्षक वर्गांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी श्री. गणेश पाटील श्री. अमृत लोखंडे, हुमा शहा श्री. लक्ष्मण कोरवन यांनी विशेष काम केल्याबद्दल कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

**दि. १३/१०/२०१८ –** Health is Wealth या उपक्रमा अंतर्गत डॉ. सुहास जोशी जालान मेहता फाउंडेशन पुणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानात जिवाणू विषाणूमूळे होणारे आजार या विषयावर डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

आजार होवू नये त्यासाठी घ्यावयाची काळजी, स्वच्छता कशी ठेवावी याबाबत माहिती मिळाली.

सर्व शिक्षक वर्ग या व्याख्यानाच्या कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. संदिप जगदाळे व श्री. राजाराम जगताप यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

**दि. १५/१०/२०१८ –** जागतिक पांढरीकाठी दिन शाळेत साजरा करण्यात आला. पांढरी काठीचे महत्व उपयोग, तिचा उपयोग कसा करावा याबाबत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. श्रीमती. कोरपेबाई, श्री. राजाराम जगताप श्री. दामोदर सरगम सर, सौ. मनिषा शेवाळे यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. सर्वांनी पांढरी काठीचा वापर व अंशतः ब्लाईंड विद्यार्थ्यांनी चष्मा वापरावा असा संदेश देण्यात आला.

**दि. १५/१०/२०१८ –** जागतिक पांढरी काठी दिनांचे औचित्य साधून शाळेतील ५० विद्यार्थी व १० कर्मचारी वर्ग यांना दृष्टीहीनांसाठीचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना पाहण्याचा आनंद व अनुभव दिला. पंडीत जवाहरलाल नेहरु स्टेडियम स्वारगेट पुणे येथे भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यातील आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी क्रिकेट सामन्याचा आनंद व अनुभव घेतला. सिने अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांच्याशी विद्यार्थ्यांनी संवाद केला. पीडीओए चे पदाधिकारी यांची भेट झाली.

भारतीय क्रिकेट संघातील खेळाडू व श्रीलंका क्रिकेट संघासोबत फोटो (छायाचित्रे) काढले. भारतीय क्रिकेट संघातील खेळाडुंशी मुलांनी गप्पा-गोष्टी केल्या प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले, श्री. राजाराम जगताप, श्री. गणेश पाटील श्री. राजेंद्र सुतार श्री. रंगनाथ गजरे श्री. अमृत लोखंडे, श्री. खिळेसर, श्री. जगताप श्री. सरगम श्री. बेंद्रेसर यांनी सामना पाहण्यासाठी सहभाग घेतला. श्री. अशोक केदारी श्री. शेरीकर आले होते सीएबीएम यांनी नियोजन केले होते.

**दि. २६/१०/२०१८ –** BNY Mellon कंपनीतर्फे मुलांना दिवाळी भेट या कार्यक्रमाचे आयोजन शाळेत करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांना दिपावली

सणा करीता नवीन ड्रेस व दिवाळी फराळ, खाऊ वाटप करण्यात आला. कंपनीचा सर्व स्टाफ कार्यक्रमात सहभागी होता मुलांसाठी संगीत खुर्ची हा खेळ घेतला. विजेत्या स्पर्धकास बक्षिसे देण्यात आली. मुलांसोबत गाण्यावर नृत्यही केले. दिपावलीच्या शुभेच्छा देत मुलांसोबत स्टाफनी दिवाळी साजरी केली. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसाहेब यांनी केले होते.

**दि. २६/१०/२०१८ –** रोजी मेट्रो ग्लोबल सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनीतर्फे मुलांना दिवाळी भेट देण्याचा कार्यक्रम झाला.

**दि. २८/१०/२०१८ –** मुकूल माधव फांऊडेशन पुणे यांच्या वर्धापनदिना निमित्त जे डब्ल्यु मेरिएट हॉटेलमध्ये कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात ८ मुलांनी भाग घेतला मायकेल जॅक्सनच्या गीतांवर मुलांनी नृत्ये केले. भारतीय संघातील क्रिकेटपटू हार्दिक पांडया यांची विद्यार्थ्यांशी भेट झाली. संवाद झाला लारा दत्ता, अमृता फडणवीस भेटल्या पियूश व परिणिता मॅडम श्री. अमृत लोखंडे सहभागी होते.

**दि. २९/१०/२०१८ –** डोळे तपासणी केलेल्या मुलां पैकी ९ विद्यार्थ्यांना पुढील उपचारा करीता एच.व्ही.देसाई हॉस्पीटल येथे नेले होते. पुन्हा तपासणी करुन ३ विद्यार्थ्यांचे ऑपरेशन करण्यासाठीची कार्यवाही करण्याचे सांगितले श्री. लक्ष्मण कोरवन व श्री. संदिप जगदाळेसर हुमा शहा विद्यार्थ्यां सोबत गेले होते. पालकांशी चर्चा व सहमतीने कार्यवाही करण्याचे ठरले.

**दि. ०२/११/२०१८–** पालक सभा

या दिवशी पहिल्या सत्रातील इ.१ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्याच्या पालकांसाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेचे उपक्रम विशेष सूचना व इतर विद्यार्थ्यांच्या विकासाबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले. दिपावली सुट्टी साठीचे नियोजन सांगण्यात आले. पालक सभेतील मुद्दे श्री. जगताप सरांनी वाचन केले. पालकाच्या सूचनांना व प्रश्नांना श्री. भोसलेसर प्राचार्य यांनी मार्गदर्शन व उत्तरे दिली. सोशल वर्कर श्री. जगदाळे सर व सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

**दि. २६/११/२०१८ – संविधान दिन –**

शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमात प्राचार्य चंद्रकांत भोसलेसरांनी संविधानाचे महत्व संविधान सभा व इतर अनुशंगीक माहिती आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर सौ. संगीता माटेबाई यांनी संविधान उद्देशिकांचे वाचन केले. सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भाग घेतला श्री. राजाराम जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**दि. २८/११/२०१८ –** म. फुले यांची १२५ वी पुण्यतिथी शाळेत साजरी करण्यात आली. फोटोपूजन व पुष्पहार घालण्यात आला. बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सौ. माटेबाई यांनी वाचन केले. श्रीमती. प्रतिभा कोरपे व श्री. राजाराम जगताप सर यांनी म. फुलेंच्या जीवन कार्याची माहिती सांगितली सुत्रसचांलन श्री. पाटील सर यांनी केले आभार श्रीमती. शेवाळे मॅडम यांनी मानले.

**दि. २९/११/२०१८ –** भारत सरकारतर्फे गोवर/रुबेला लसीकरण मोहीमेअंतर्गत वयोगट ९ ते १५ वर्षापर्यंतच्या ८५ विद्यार्थ्यांना गोवर व रुबेला लस देण्यात आली म.न.पा. कवडे पाटील हॉस्पीटल कोरेगांव पार्क यांचेमार्फत लसीकरण करण्यात आले. डॉ. उज्वला मेश्राम, सौ. कविता व्यवहारे, श्रीमती. अन्नपुर्णा शिंदे

यांनी लसीकरण केले. या कार्यक्रमात प्र.अ.श्री. कृष्णा शेवाळे सर व प्राचार्य चंद्रकांत भोसले सर उपस्थित होते. नोडल ऑफीसर म्हणून श्री. राजाराम जगताप सर यांनी काम पाहिले सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. कमला नेहरु रुग्णालयातील स्टाफ सहभागी झाला. सा.कार्यकर्ता श्री. संदिप जगदाळे व सौ. माटे मॅडम, योगीता पवार यांनी रजिस्ट्रेशनचे काम केले.

**दि.०३/१२/२०१८ –** जागतिक अंपग दिन कार्यक्रम – यादिवशी शाळेत अपंग दिन साजरा करण्यात आला. सकाळी ९ ते २.०० वा. शाळा भरविण्यात आली. विद्यार्थ्यांच्या विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमात जागतिक अपंग दिनाबाबत सौ. संगीता माटेबाई व श्रीमती. प्रतिभा कोरपेबाई यांनी माहिती सांगितली या कार्यक्रमासाठी २१४ पुणे कॅन्टोनमेंन्ट विधानसभा (अ.जा.) मतदार संघ पुणे मा.तहसीलदार मॅडम सौ.सुरेखा दिवटे, श्री. आर. एस. फडतरे व कार्यालयातील सहकारी आले होते. मा. श्री. शेवाळे साहेब प्र.अधिकारी यांनी तहसीलदार यांना शाळा दाखवली. विद्यार्थ्यांच्या गटानुसार फुगे फुगविणे, फुगे फोडणे, संगीत खुर्ची, बेडूक उडी व बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धा पाहुण्या समोर घेण्यात आल्या. पाहुण्यांच्या हस्ते कर्मचारी वर्गाचे व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून अभिनंदन करण्यात आले. मा. सौ.सुरेखा दिवटे यांनी मुलांशी संवाद साधला व मतदानाबाबत माहिती दिली. शाळेच्या कार्याचे कौतुक केले मुलांना खाऊ देण्यात आला. स्पर्धेचे व कार्यक्रमाचे नियोजन सौ. संगीता माटे सौ. मनिषा शेवाळे श्री. राजाराम जगताप श्री. रंगनाथ गजरे व सौ. रेखा राऊत तेजस बेंद्रेसर यांनी केले होते. प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, सोशल वर्कर श्री. संदिप जगदाळे उपस्थित होते. श्री. गजरे यांनी आभार मानले बालकल्याण संस्थेत जागतिक अपंगदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपट अभिनेता स्वप्नील जोशी व अभिनेत्री मुक्ता बर्वे आले होते. आपल्या शाळेतील ५ विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी भाग घेतला. या कार्यक्रमात शाळेचे लेझीम पथक होते. विद्यार्थ्याची सी. आर. रंगनाथन विद्यालयातील मुली व मुले लेझीम पथकात सामील होते. स्वागतगीत व विद्यार्थ्यांचे समूहगीत सादर करण्यात आले. वाद्यवृदांद्वारे राग दरबारी कानडा वाजविला मुलांसाठी विविध खेळाचे आयोजन केले होते. त्यात मुलांनी सहभाग घेतला. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसलेसर यांनी नियोजन केले होते. श्रीमती. आशा कणसे, श्री. खिळे सरांचा सहभाग होता. अशा प्रकारे अपंग दिन साजरा करण्यात आला.

**दि. ०५/१२/२०१८ –** रोजी सर्वशिक्षा अभियाना तर्फे एसएसऐ कार्यालय दादाजी कोंडदेव शाळा, पुणे म.न.पा. कसबा पेठ येथे साहित्य वाटपाचा कार्यक्रम झाला. शाळेतील ८ डी.एस.विद्यार्थी गेले होते. विद्यार्थ्यांना साहित्य मिळाले सोबत पालक गेले होते.

| | |
|---|---|
| प्रथमेश नेटावटे | - डि.जी.प्लेअर, स्मार्टफोन |
| संग्राम आरडे | - डि.जी.प्लेअर, स्मार्टफोन |
| नैतिक विकारी | - ब्रेलकिट व स्मार्टफोन |
| वेदान्त लादे | - डि.जी.प्लेअर, स्मार्टफोन |
| प्रथमेश दामगुडे | - ब्रेलकिट व स्मार्टफोन |
| वेद सावजी | - डि.जी.प्लेअर, स्मार्टफोन |
| निखील गावडे | - ब्रेलकिट व स्मार्टफोन |
| विराज कामथे | - ब्रेलकिट व स्मार्टफोन |

शाळेने नावे कळविली होती. श्री. गणेश पाटील श्री. अमृत लोखंडे, श्री. जगताप, सौ. योगीता पवार यांनी पालकांशी संपर्क साधून माहिती दिली प्राचार्य श्री. भोसलेसर यांनी नियोजन केल होते.

**दि. ०६/१२/२०१८ –** या दिवशी डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम झाला डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेस प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. आशिष भद्रे या विद्यार्थ्याचे भाषण झाले. संग्राम आरडे याने गाणे म्हटले. श्री. भोसले सर प्राचार्य यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. सौ. माटेबाई श्री. सरगम सर, श्री. राजाराम जगताप श्रीमती. कोरपे, श्री.अमृत लोखंडे यांनी डॉ. आंबेडकराबद्दल माहितीचे वाचन केले श्री. इरनक सरांनी भाषण केले. श्री. गणेश पाटील सरांनी सूत्रसंचालन केले तर सौ. मनिषा शेवाळे यांनी आभार मानले अशा प्रकारे पुण्यतिथीचा कार्यक्रम झाला सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता.

**दि. ०८/१२/२०१८ –** या दिवशी स्काऊट गाईड तर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील ४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. मैदानी खेळ व राष्ट्रीय सण या विषयावर चित्रे काढली स्वयंपाक बनविणे स्पर्धेत मुलांनी चुलीवर भाकरी व झुणका बनविला. सौ. शेवाळे मॅडम व सौ. शितल गायकवाड सोबत गेले होते.

**दि.१०/१२/२०१८–** रोटरी क्लब ऑफ पुणे इंटरनॅशनल व इन्टरअॅक्ट क्लब पुणे यांच्या तर्फे मेरी कविता मेरे गीत हा कार्यक्रम झाला. परवेझ आत्तार, यश वाघ, नोमान तांबोळी, प्रथमेश नेटावटे, शशिकांत शिंदे यांचा सहभाग होता. साबीर शेख या विद्यार्थ्यांने पाहुण्याचे स्वागत केले. या कार्यक्रमात श्री. रंगनाथ गजरे सर यांनी देवा विठ्ठला हे भक्तिगीत सादर केले. श्री. संतोष जगताप सर व श्री. खिळे सर यांनी संगीत साथ केली. रोटरीयन शोभना ग्रोव्हर यांनी सुत्रसंचालन केले. सायंकाळी ५.०० ते ६.१५ या वेळात कार्यक्रम संपन्न झाला.

**दि. ११/१२/२०१८ –** मंगळवार शाळेचे संस्थापक स्वर्गीय डॉ. एस. आर. माचवे यांची पुण्यतिथीनिमित्त क्रिडा स्पर्धेचे आयोजन १७ खेळ स्पर्धा प्रकार घेण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन प्र.अधिकारी श्री. शेवाळेसाहेब व प्राचार्य श्री. भोसलेसर यांच्या हस्ते झाले. डॉ. माचवे यांच्या पुतळयाचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. श्रीमती. प्रतिभा कोरपे यांनी स्वर्गीय डॉ.एस.आर.माचवे यांच्या कार्याची माहिती दिली. बेडूक उडी, धावणे, दोरीउडी मारणे, लांबउडी, चमचा लिंबू, बुद्धिबळ, गोळाफेक इत्यादी क्रिडा स्पर्धा झाल्या. विद्यार्थ्यांना व स्टाफला भोजन देण्यात आले. दु.४.३० वा. बक्षिस समारंभ घेण्यात आला. विद्यार्थ्यांना प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. सर्व स्पर्धा पार पाडण्यासाठी सर्व शिक्षकांची मदत झाली. श्री. चंद्रकांत भोसले प्राचार्य, सौ. संगीता माटे, श्री. राजाराम जगताप श्री. राजेंद्र सुतार श्री. रंगनाथ गजरे यांनी नियोजन केले होते.

**दि. १५/१२/२०१८ –** शनिवार - शैक्षणिक सहल चोखीधाणी नगर रोड, वाघोली पुणे इ.१ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांची सहल चोखीधाणी नगर रोड येथे गेली होती. बीएनवाय मेलन या कंपनी तर्फे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८.३० वाजता शाळेतून सहल निघाली. प्रवासात विद्यार्थ्यांनी गाणी, भेंडया खेळणे यात भाग घेतला. चोखीधाणी येथे गेल्यावर राजस्थानी पद्धतीने वाद्य वाजवून व कपाळाला तिलक लावून सर्वांचे स्वागत करण्यात आले. प्रथम विद्यार्थ्यांना नाष्टा देण्यात आला. इडली चटणी, कांदाभजी, चहा घेत मुले गप्पामध्ये रंगली होती. त्यानंतर मुलांनी विविध खेळण्यात भाग घेतला. कोलंबस, ट्रेनची सफर, झोके, घसरगुंडी इत्यादी होते. मुले आनंदात होती. कुंभारकाम, तेलकाढण्याचा घाणा, जाते, शेतकरी, बैलजोडी, नांगर व इतर पारंपारिक वस्तू विद्यार्थ्यांनी स्पर्शाने अनुभवल्या शिक्षकांनी म ाहिती दिली. दुपारी १२.३० वाजता सर्वांनी राजस्थानी पद्धतीच्या जेवणाचा आस्वाद घेतला त्यानंतर कठपुतली

डान्स, डोंबाऱ्याच्या तारेवरील कसरती पाहिल्या साउंड सिस्टिमवर गाण्यावर विद्यार्थ्यांनी डान्स करुन आनंद लुटला विद्यार्थी विरुद्ध शिक्षकवर्ग गाण्याच्या भेंडया झाल्या. दुपारी ३.३० वाजता सहल शाळेत परत आली. बीएनवाय मेलन कंपनीचे कर्मचारी व पदाधिकारी सोबत होते. श्री. पार्थसर श्री. अमेय सर यांनी नियोजन केले होते. सहली बाबतची तयारी व कामाचे नियोजन सौ. संगीता माटे श्री. राजाराम जगताप श्री. राजेंद्र सुतार यांनी केले सर्व शिक्षकांचे सहकार्य सहल यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता झाले.

**दि. १६/१२/२०१८ –** रविवार - सकाळ चित्रकला स्पर्धा सकाळी ९.०० ते १२.३० देशातील सर्वात मोठया चित्रकला स्पर्धेत शाळेतील ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. पार्शली ब्लाइन्ड मुलांनी आपापल्या गटातील विषयानुसार रंगीबेरंगी छान सुंदर अशी चित्रे काढण्याचा आनंद घेतला. स्पर्धेबाबतचे नियोजन प्र. अधिकारी श्री. कृष्णा शेवाळेसर यांनी केले होते. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसलेसर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. राजाराम जगताप विशेष शिक्षक व श्री. रंगनाथ गजरे कलाशिक्षक यांनी काम केले.

**दि. १६/१२/२०१८ –** विद्यार्थ्यांसाठी हुरडा पार्टी कार्यक्रम एम्प्रेस गार्डन पुणे. मा. प्रशांत चव्हाण यांनी एम्प्रेस गार्डन येथे विद्यार्थ्यांसाठी हुर्डा पार्टीचे आयोजन केले होते. ९६ मुले ३ शिक्षक व ३ इतर कर्मचारी वर्ग सहभागी होता. यामध्ये शाळेच्या ऑर्क्रेस्ट्राचा कार्यक्रम झाला मुलांना स्नॅक्स, हुर्डा आणि चटणी देण्यात आली. गाणी ऐकत मुलांनी हुर्डा पार्टीचा आनंद घेतला. श्री. खिळेसर श्री. संतोष जगतापसर, हुमा शहा, लक्ष्मण कोरवन, अनिता चलवादी, शितल गायकवाड सोबत गेले होते.

**दि. १७/१२/२०१८ –** रो रॉयल ट्रॅक ऑफ पुना यांच्या तर्फे गाण्याचा अंताक्षरी खेळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ६० गाणी होती. विद्यार्थ्यांनी आनंदाने भाग घेतला किर्ती मॅडम यांनी आयोजन केले होते. या कार्यक्रमात श्री. संतोष जगताप, श्री. खिळेसर, श्री. लोखंडेसर सहभागी झाले होते.

**दि. १८/१२/२०१८ –** आकाशवाणी पुणे केंद्र यांच्या वतीने 'खुले आकाश उगवते तारे' या कार्यक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थी रोहित भरगुणे (पोहणे) व प्रथमेश नेटावटे काव्यवाचन व नोमान तांबोळी वादन यांची शिवाजीनगर पुणे येथे आकाशवाणी केंद्रावर मुलाखत झाली. विद्यार्थ्यांनी दिलखुलास मुलाखत दिली. स्टेशन निर्देशक श्री. गोपाल आवटे कार्यक्रम आयोजक प्राजक्ता कुलकर्णी व जयश्री कांबळे यांनी अंध विद्यार्थ्यांचे खास अभिनंदन केले श्री. गजरे रंगनाथ यांनी मार्गदर्शन केले होते.

**दि. २७/१२/२०१८ –** समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद पुणे यांच्या वतीने दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय पोहणे व बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. पोहणे स्पर्धेत - ९ बुद्धीबळ स्पर्धेत एकूण पाच बक्षिसे मिळाली श्री. रंगनाथ गजरे, श्री. राजेंद्र सुतार यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले दि. ०३/०१/२०१९ रोजी पोहण्याच्या स्पर्धा घेण्याचे ठरले. बालकल्याण संस्थेच्या तलावावर पोहण्याच्या स्पर्धा झाल्या.

**दि. २९/१२/२०१८ –** संगीत समिती कार्यक्रम - शाळेचा माजी विद्यार्थी व प्रसिद्ध कव्वाली व गझल गायक श्री. सुभाष वाघमारे व त्यांचे सहकारी यांनी गायनाचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात अभंग, भक्तीगीते, कव्वाली, गझल, देशभक्तीपर गीते झाली.

श्री. नारायण चिंचवडे म.न.पा.शाळा शिक्षक व श्री. संतोष जगताप यांनी वाद्य वाजवून छान अशी साथ केली.

मानधन व पुष्प देवून श्री. वाघमारे यांचा श्री. चंद्रकांत भोसले प्राचार्य यांनी सत्कार केला. दुपारी २.३० ते ५.१५ या वेळेत संगीत समिती तर्फे कार्यक्रम ठेवण्यात आला होता. सर्व शिक्षकवर्ग व पालकवर्ग उपस्थित होता.

**दि. ०३/०१/२०१९ –** क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पूजन सौ. संगीता माटेबाई यांच्या हस्ते करण्यात आले. बालसभेत, विद्यार्थ्यांनी भाषणातून सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र व कार्याबद्दल माहिती दिली. श्रीमती. कोरपेबाई श्री. इरनक सर श्री. सरगम सर यांनी भाषणातून विद्यार्थ्यांना माहिती दिली. सौ. रेखा राऊतबाई व सौ. संगीता माटेबाई यांनी वाचन केले. श्री. चंद्रकांत भोसले प्राचाये उपस्थित होते. श्री. अमृत लोखंडे यांनी आभार मानले.

**दि. ०३/०१/२०१९ –** दिव्यागांच्या अंध गटातील जिल्हा स्तरीय पोहण्याच्या स्पर्धा झाल्या. स्पर्धेत एकूण ७ विद्यार्थी सहभागी होते.

**दि. ०४/०१/२०१९–** लुई ब्रेल जयंती कार्यक्रम – शाळेत लुई ब्रेल यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. लुई ब्रेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून, फोटो पूजन प्राचार्य श्री. चंद्रकात भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम बालसभा झाली विद्यार्थ्यांनी भाषणे केली. श्री. भोसले चंद्रकात प्राचार्य यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना लुई ब्रेल यांच्या बद्दल माहिती सांगितली व ब्रेलचे महत्व विषद केले. श्री. इरनक सर श्री. सरगम सर श्रीमती. कोरपेबाई यांनी भाषणे केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शेवाळे मॅडम यांनी केले तर आभार श्री. राजाराम जगताप यांनी मानले.

सकाळी ११ ते १.३० या वेळेत ब्रेल लेखन, ब्रेल वाचन, मराठी/हिंदी निबंध लेखन, इंग्रजी ब्रेल वाचन, गोष्टी सांगणे, स्पर्शाने वस्तू ओळखणे इत्यादी विविध गटात स्पर्धा घेण्यात आल्या दुपारी ३.०० वाजता बालसभा व ४ ते ५ या वेळेत मुलांनी मनोरंजनाचे कार्यक्रम केले गाणी, नकला विनोद इत्यादी सादर केले.

ऑक्रेस्ट्रा ग्रुपने गाणी सादर केली. श्री. रामेश्वर खिळे यांनी मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले.

**दि. ०७/०१/२०१९ –** रुबेला/गोवर लसीकरण मोहिमे अंतर्गत विद्यार्थ्यांना लस देण्याचा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना गोवर लस देण्यात आली. या शिबीरात ३० विद्यार्थ्यांना लाभ झाला.

सौ. योगीता पवार, श्री. लक्ष्मण कोरवण यांनी चांगले सहकार्य केले.

**दि. ०८/०१/२०१९ –** पुणे मुलींची अंधशाळा गांधी भवन येथे 'वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम' झाला या कार्यक्रमासाठी आपल्या शाळेतील ३० विद्यार्थी व ६ शिक्षकवर्ग व मा. प्राचार्य श्री. चंद्रकात भोसले सर गेले होते. विद्यार्थ्यांना चहा व नाष्टा देण्यात आला. विद्यार्थ्यांना शाळा दाखविण्यात आली.

